या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार २८ ऑगस्ट २०२४ | अंक२६२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# मोदींच्या हस्ते अनावरण झालेला शिवरायांचा भव्य पुतळा कोसळला, एकनाथ शिंदे यांची पहिली प्रतिक्रिया काय?

## एकनाथ शिंदे काय म्हणाले?

“झालेली घटना ही दुर्दैवी आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. हा पुतळा नौदलाने उभारला होता. त्याचं कम्पलिट डिझाईन नेवीने तयार केलं होतं. मी कलेक्टरशी बोलल्यानंतर त्यांनी मला सांगितलं की, ताशी 45 किमी वेगाचा वारा होता. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे पुतळ्याचं नुकसान झालं आहे. उद्या तिथे नेवीचे अधिकारी येणार आहेत. आमचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण घटनास्थळी गेले आहेत. मी त्यांना सूचना केलेल्या आहेत. उद्या तात्काळ नेवीचे अधिकारी आणि आमचे अधिकारी हे छत्रपती शिवरायांचा पुतळा उभारण्याचं पुन्हा काम करतील”, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.आमदार वैभव नाईक यांनी या घटनेनंतर मालवणमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाची तोडफोड केली. याबाबत एकनाथ शिंदे यांनी प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी “ठीक आहे. शेवटी भावना आहे. छत्रपती शिवाजी महाराज आपले दैवत आहेत. पण कायदा हातात घ्यायची आवश्यकता नाही. कायदा-सुव्यवस्था राखण्याचं काम प्रत्येकाने केलं पाहिजे. कायदा हातात घेण्याचा कुणालाही अधिकार नाही. राज्यात शांतता आणि सुव्यवस्था राहिली पाहीजे यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याची आवश्यकता आहे”, अशी प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा 35 फुटांचा उंच असा भव्य पुतळा मालवणमध्ये राजकोट किल्ल्याच्या परिसरात उभारण्यात आलेला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 4 डिसेंबर 2023 ला नौदल दिनाच्या निमित्ताने शिवरायांच्या या भव्य पुतळ्याचं अनावरण करण्यात आलेलं. पण हा पुतळा अवघ्या आठ महिन्यांमध्ये कोसळला आहे. त्यामुळे शिवप्रेमींकडून संताप व्यक्त केला जातोय. ज्या शिवाजी महाराजांनी अभेद्य असे किल्ले बांधले, विशेष म्हणजे समुद्रात किल्ला बांधला त्यांचा पुतळा अवघ्या आठ महिन्यात कोसळल्याने संताप व्यक्त केला जातोय. या घटनेवरुन विरोधकांकडून राज्य सरकारवर निशाणा साधला जातोय. या घटनेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. शिंदे यांनी प्रसारमाध्यमांना या घटनेवर प्रतिक्रिया दिली. छत्रपती घराण्याचे कोल्हापूर गादीचे वंशज तथा माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिलीय.



“पंतप्रधानांनी उद्घाटन करण्यासाठी घाई गडबडीत उभारलेला पुतळा कोसळला! मुळातच आकारहीन आणि शिल्पशास्त्रास अनुसरून नसलेला, घाईगडबडीत उभारलेला हा पुतळा बदलावा म्हणून तेव्हाच आम्ही पंतप्रधानांकडे पत्र लिहून मागणी केली होती. या महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक वर्षभरात कोसळते यासारखी दुर्दैवी बाब कोणती नाही. अशा परिस्थितीत महाराजांच्या किल्ल्यांवर आपण कोणत्या अधिकाराने बोलणार? आता त्याठिकाणी पुन:श्च महाराजांचे उचित स्मारक उभारणे गरजेचेच आहे. पण निवडणुकीच्या आधी ते उभारण्याच्या इर्ष्येत परत काही गडबड करू नये. उशीर होऊदे पण शास्त्रोक्त पद्धतीने या स्मारकाची पुनर्बांधणी झाली पाहिजे”, असं संभाजीराजे छत्रपती म्हणाले आहेत.









# बाळासाहेब आजबे मतदार संघातील दमदार कामगिरी करणारा जनतेचा आमदार ,माणूस सर्वसामान्य जनतेचा



**पाटोदा प्रतिनिधी:-**
बाळासाहेब आजबे हे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील विकासाभिमुख नेत्रत्व असून जनसामान्य जनतेसाठी , मतदार संघासाठी विकास व्हावा म्हणून झटणारे व्यक्तीमत्व आहे त्यांच्यावर टीकाकारांनी टीका केली परंतु कोणत्याही टीकेला उत्तर नदेता त्यांनी विकासाचा रथ अविरत चालू ठेवला बीड जिल्ह्यात सर्वाधीक निधी खेचून आणणारा आमदार म्हणून त्यांनी ख्याती मिळवली आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात जलसिंचन कामना मंजुरी आणून त्यांनी तिन्ही तालुके पाण्याच्या बाबतीत साधन करण्यासाठी प्रयत्न केले मतदार संघातील पाणी , आणि लाईट चे प्रश्न बऱ्या पैकी सोडवले मतदार संघातील 150 कोटीच्या बंधार्याना मान्यता मिळवून प्रत्यक्षात कामांना सुरवात केली , आष्टी पाटोदा शिरूर येथील प्रशासकीय इमारतींना मंजुरी आणून शहराच्या वैभवात भर घातली , महसूल इमारती मजुरी , अधिकारी निवास्थाने मंजुरी , मुद्रांक कार्यालय इमारती , 200 गावामध्ये ओपन जिम , व सभागृह बांधकाम 33 kv मंजुरी , अनेक मतदार संघातील रस्त्यांना मंजुरी मिळवली बहू चर्चित शिंपोरा ते कुंटेफळ थेट पाईप लाईन अशी एकूण 2500 कोटी पेक्षा जास्त कामे मंजूर करून मतदार संघाचा विकास साधला आहे मागील 25 वर्षात कधी नाही एवढा विकास निधी मतदार संघास मंजूर करून मतदार संघ जिल्ह्यात न 1 वर आणला आहे , अजात शत्रू व्यक्तिमत्व म्हणून आजबे काकांनी ख्याती मिळवली आहे विरोधकांचा सुद्धा सन्मान करणारा आमदार म्हणून त्यांची ख्याती आहे , सर्व जाती धर्मांना सन्मानपूर्वक वागणूक देणारा नेता म्हणून आजबे काका जनतेच्या मनातील ताईत ठरले आहेत मतदार संघातील कोणतेही गाव विकासापासून वंचित राहणार नाही याची दक्षता त्यांनी घेतली आहे एखादे काम जरी झाले नाही तरी गावागावात भांडणे लावू नयेत अशी भूमिका त्यांनी घेतली कोणाच्या चांगल्या कामात आडवे करण्याची भूमिका त्यांनी घेतली नाही म्हणून जनसामान्यात आपला माणूस आपला आमदार हि त्याची प्रतिमा बनत चालली आहे , कार्यकर्त्यांना कधीही जनतेच्या कमला या कोणाला त्रास देऊ नका अशीच भूमिका त्यांनी नेहमी घेतली आहे त्यांच्या माध्यमातून इतर नेत्यांनी सुद्धा त्याचा बोध घ्यावा असे व्यक्तिमत्व आहे त्यामुळे आष्टी पाटोदा शिरूर मधील जनता आजबे काका ची कामगिरी दमदार म्हणत असून आजबे काका वन्स मोअर चा नारा देत आहे म्हणूनच त्याच्या बाबतीत म्हणावे वाटते आपला माणूस आपला आमदार कामगिरी दमदार

## सन २०२२ पासून बेपत्ता असलेल्या मुलीचा व आरोपीचा ए.एच.टी.यू. कडे तपास आल्यानंतर अवघ्या ६ दिवसात शोध

संतोष औताडे- अहमदनगर प्रतिनिधी दि.२६/०८/२०२४ प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, संगमनेर तालुका पो.स्टे. गुन्हा रजि. नं. । ३९२/२०२२ भादवि कलम ३६३, ३७० प्रमाणे दि. १५/०९/२०२२ रोजी दाखल होता. सदर गुन्ह्यात यातील अल्पवयीन मुलीस आरोपी नामे सौरभ अरविंद ठाकूर वय २५ वर्षे रा. चौदा निलेश भाई की चाल दाभेल दमण बलसाड दमण डीडी ३९६२१० सर्कल गुजरात मूळ रा. आलनपुर पो.स्टे. चौका जि. सागर मध्यप्रदेश याने फूस लावून पळवून नेले होते. सदर गुन्ह्याचा पो.स्टे स्तरावर तपास न लागल्याने दि. १९/०८/२०२४ रोजी पुढील तपास कामी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष अहमदनगर येथे वर्ग करण्यात आलेला होता.




सदर गुन्ह्याचा तपास पोसई बाळासाहेब शिंदे हे करीत होते. सदर गुन्ह्यातील अपहरीत मुलगी व आरोपी यांचा शोध घेत असताना व गुप्त बातमीदारामार्फत माहिती घेवून पाठपुरावा करत असताना यातील आरोपी व अपहरीत मुलगी असे बोल्हेगाव, अहमदनगर येथे आल्याची माहिती मिळाल्याने पोसई बाळासाहेब शिंदे हे स्टापसह बोल्हेगाव, अहमदनगर येथे जावून तेथून अपहरीत मुलगी, आरोपी व त्यांचा १ वर्षाचा मुलगा यांना ताब्यात घेवून सदर गुन्ह्याचे तपासाचे मूळ कागदपत्र, केसडायरीसह अपहरीत मुलगी व आरोपी असे संगमनेर तालुका पोलीस स्टेशनला पुढील तपासकामी हजर करण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई मा. श्री राकेश ओला, पोलीस अधिक्षक, अहमदनगर, श्री प्रशांत खैरे, अपर पोलीस अधिक्षक अहमदनगर, श्री अमोल भारती पोलीस उपअधिक्षक, नगर शहर विभाग, चार्ज आर्थिक गुन्हे शाखा, अहमदनगर, श्री. राजेंद्र इंगळे, नेम. ए. एच.टी.यू. अहमदनगर यांचे सूचना व मार्गदर्शनाखाली पोसई / बाळासाहेब शिंदे, पोहेकॉ / २०२४ समीर सय्यद, मपोहेकॉ १२४६ / अर्चना काळे, मपोहेकॉं / १०८२ अनिता पवार, मपोकॉं/१३६५ छाया रांधवन, चापोकॉं / २६७३ काळे सर्व नेम- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष (AHTU) अहमदनगर यांनी केली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा कोसळल्याच्या दुर्दैवी घटनेचा आम आदमी पार्टी च्या वतीने जाहीर निषेध

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे लोकार्पण करण्याचे श्रेय माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतले, ढासळल्याची पण घ्यावी माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी**



बीड:आम आदमी पार्टी बीड जिल्ह्याच्या वतीने नोंदवण्यात येत आहे की महाराष्ट्राचे कुलदैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा कोसळला या दुर्दैवी घटनेचा निषेध नोंदवत आहे कारण ज्या महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराज हे कुलदैवत मानले जाते त्या महाराजांचा फक्त आठ महिन्याच्या कालावधीमध्ये कोसळतो आणि तोही देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातसे त्याचे लोकार्पण होते आणि तो पुतळा फक्त आठ महिन्यांमध्ये कोसळतो या पेक्षा मोठा दुर्दैव या देशांमध्ये होऊ शकत नाही तर माननीय पंतप्रधान यांनी लोकार्पण करण्याची वा वाई घेतली तर आता पुतळा ढासळला याची देखील जिम्मेदारी घ्यावी या भयानक गोष्टीची कसून चौकशी झाली पाहिजे आणि या देशांमध्ये किती खालच्या दर्जापर्यंत निकृष्ट काम करण्याची वृत्ती आणि भ्रष्टाचाराचे मूळ पोहोचले आहेत हे कळत आहे यामध्ये दोषी असणारे नेते असतील गुत्तेदार असतील अधिकारी असतील आणि ज्या लोकांनी या पुतळ्याचे लोका अर्पणाचे श्रीय घेतले असेल त्या जिम्मेदार लोकांनी देखील या निकृष्ट दर्जाच्या पुतळा निर्मितीची जबाबदारी घ्यावी आणि देशातील नागरिकांची व छत्रपती शिवाजी महाराजांची नाक रगडुन माफी मागावी या गोष्टीचा जाहीर निषेध आम आदमी पार्टी कडून जिल्हा अधिकाऱ्यांच्या मार्फत नोंदविण्यात आला आहे यावेळी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे, शहर प्रमुख सय्यद सादेक, तालुका उपाध्यक्ष आजम खान, तालुका संघटन मंत्री दत्ता सुरवसे, अल्पसंख्याक विभाग प्रमुख पठाण, प्रमुख रामभाऊ शेरकर, युवा नेते प्रवीण आणेराव ,श्री सोनवणे व सौ सोनवणे मॅडम इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते

## संत सावता गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी संदीप नाईकनवरे तर उपध्यक्षपदी सांगळे, शेवाळे यांची निवड




पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा तालुक्यातील मानाच्या गणेश मंडळा पैकी एक व अनेक वर्षी नंबर एकचे पारितोषक मिळवणाऱ्या श्री संत सावता गणेश मंडळाची बैठक संत सावता महाराज मंदीर माळेगल्ली पाटोदा येथे संपन्न झाली दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात गणेश उत्सव साजरा करण्यासाठी श्री संत सावता महाराज गणेश मंडळाची बैठक झाली यावर्षीच्या संत सावता गणेश मंडळाच्या अध्यक्ष पदी संदीप नाईकनवरे तर उपाध्यक्षपदी जितेंद्र सांगळे, राहुल शेवाळे तर सचिव पदी भागवत नाईकनवरे यांची एकमताने निवड झाली तसेच सहसचिव पदी विशाल नाईकनवरे व कोषाध्यक्ष ओम गोरे यांची निवड करण्यात आली यावेळी संत सावता माळी गणेश मंडळाचे मोठ्या संख्येने सदस्य उपस्थित होते

## ज्ञानेश्वरी ईंग्लिश स्कूल मध्ये राधाकृष्ण देखाव्यासह दहीहंडी साजरी

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : मारतळा-येथील ज्ञानेश्वरी प्रायमरी, सेकेंडरी ईंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण व राधेची वेषभुषा परिधान करत विविध हिन्दी व मराठी चित्रपट सृष्टीमधील पौराणिक तसेच आलिकडील गितांच्या बोलावर ठेका धरत आपली नृत्यकला दाखवत श्रीकृष्ण जन्माष्टमी मोठ्या उत्साही वातावरणामध्ये आज साजरी केली. त्यानंतर शालेय विद्यार्थ्यांनी गोविंदा रे गोपाळा , तेरी मटकी संभाल ब्रिजबाला यासह विविध गितावर ठेका धरत "ज्ञानेश्वरी दहीहंडी" फोडून आनंद व्यक्त करत ऐकमेकांना दहीहंडी मधील गोपाळकाल्याचे व खिचडीच्या महाप्रसादाचे वाटप केला.

येथील ज्ञानेश्वरी प्रायमरी, सेकेंडरी ईंग्लिश स्कूलमध्ये गेल्या पंधरा वर्षापासून दहीहंडी चे आयोजन केले जाते. आज श्रीकृष्ण जन्माच्या



कांही तास आगोदर या शाळेतील चिमुकल्यांसह मोठ्या विद्यार्थ्यांनी राधा कृष्णाची वेषभुषा धारण करत विविध गितांवर आपले नृत्य सादर करत उपस्थित पालकमंडळींसह गावक-यांना मंत्रमुग्ध केले. व राधाकृष्णाच्या भोवती पिंगा घालत आपल्या नृत्य कलेचा अविष्कार सादर केला. त्यात मैंया यशोदा तेरा कन्हैया , बन्सी बजैया, मोरे कान्हा कन्हैया, नंद के घर आनंद भयो, या हिन्दी गितांसह आज गोकुळात रंग खेळतो हरी या मराठी गितांवर आपली नृत्य कला सादर केली. त्यानंतर मुलांनी गोविंदा रे गोपाळा , गोविंदा आला रे आला सह तेरी मटकी संभाल ब्रिजबाला यासह विविध गितावर ठेका धरत नृत्य करून दहीहंडी फोडून आनंद व्यक्त केला. दरवर्षी दहीहंडी उत्सवाचे शाळेच्या वतीने करण्यात येते, ह्या कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे प्राचार्य संजय पाटील ढेपे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या शिक्षकमंडळींनी केले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजीवनी साखरे, शेख आस्मा, सिमा जोंधळे, चांगुणा भरकडे, स्वाती कपाळे, प्रिया सामला, कान्होपात्रा तिरमाले, आरती खानसोळे, कौशल्या डापरवाड या शिक्षिकांसह विलास गोणारे, सचिन आम्ले, सुनिल तारू, दत्ता येडे, बालाजी भरकडे, आनंद जाधव व छाया कोलते यांनी परिश्रम घेतले.

## भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या शास्त्रज्ञांची कृषी विज्ञान केंद्राला आढावा भेट

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली मार्फत भारतातील ७३१ कृषी विज्ञान केंद्राचा आढावा घेतला जात आहे त्याचा अनुषंगाने भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली संचलित कांदा व लसूण संशोधन संचनालय, राजगुरू नगर ,पुणे येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. राजीव काळे यांनी नुकतीच कृषी विज्ञान केंद्र पोखरणीला भेट दिली. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय कृषी अनुसंधान परिषद गीतांनी करण्यात आली त्यानंतर उपस्थित मान्यवर व प्रगतशिल शेतकरी बांधवांचा शॉल, पुष्पगुच्छ ,श्रीफळ व व.ना.म. कृषी विद्यापीठ,परभणी दैनंदिनी देऊन सत्कार करण्यात आला. तदनंतर कृषी विज्ञान केंद्र ,पोखरणी नांदेडचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.देविकांत देशमुख यांनी उपस्थित मान्यवर व जिल्ह्यातील निवडक प्रयोगशील व प्रगतशील शेतकरी बांधव यांच्या पुढे कृषी विज्ञान केंद्राच्या मागील तीन वर्षाचा विविध कृषी विस्तार कार्यक्रम , शेतकरी कल्याण कार्यक्रम आणि उपक्रमाचे सादरीकरण केले. डॉ.राजीव काळे सरांनी सादरीकरण नंतर जिल्ह्यातील निवडक प्रयोगशील व प्रगतीशील शेतकरी बांधवांशी प्रत्यक्ष संवाद साधला, आणि कृषी विज्ञान केंद्र व त्यांचे विविध कार्यक्रम प्रशिक्षणे, प्रात्यक्षिके संवाद याविषयी सविस्तर माहिती शेतकऱ्याकडून ऐकली व कृषी विज्ञान केंद्र जिल्ह्यात राबवित असलेल्या विविध उपक्रमाचे कौतुक केले. डॉ.राजीव काळे सरांनी कृषी विज्ञान केंद्राच्या विविध डेमो युनिट जसे की एकात्मिक शेती मॉडेल शेडनेट हाऊस, पॉलिहाऊस लागवड ,प्रकल्प जैविक व सेंद्रिय औषधी प्रकल्प ,सेंद्रिय परसबाग, हळद , सोयाबीन कापूस, मूग, तुर, भरडधान्य पिके आणि पिकांचे विविध वाण , पपनस फळ, करवंद लागवड, दहा ड्रम युनिट, अझोला युनिट, हायड्रोपोनिकस युनिट ना भेट दिली.




त्यानंतर मालेगाव येथील कृषी विज्ञान केंद्राच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत शेतकरी उत्पादक कंपनी ,शेतकरी गट व सेंद्रिय आणि नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकरी बांधवांच्या थेट बांधावर जाऊन संवाद साधला.मागील तीन वर्षात व सद्य परिस्थितीत कृषी विज्ञान केंद्राने राबविलेल्या विविध योजना प्रथमदर्शनी पीक प्रात्यक्षिके, शेतावरील चाचण्या, विविध प्रशिक्षणे, शेतकरी व शास्त्रज्ञ संवाद कृषी विज्ञान केंद्राचा विविध संलग्नित विभाग जसे की कृषी विभाग,आत्मा, फलोद्यान रेशीम, पशुसंवर्धन ,महिला व बालविकास, ग्राम उद्योग ,जिल्हा उद्योग केंद्र ,बँका व इतर संशोधन संस्था यांच्याशी असलेला समन्वय व कार्य प्रणाली याविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली तसेच कृषी विज्ञान केंद्र वेळोवेळी शेतकऱ्यांना करीत असलेली मदत तसेच दर्जेदार निविष्ठांचा वापर व त्याद्वारे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात आणि जीवनमानात झालेली सुधारणा याविषयी समाधान व्यक्त केले. यावेळी कोषाध्यक्ष सौ.शोभाताई विठ्ठलराव जाधव,कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ.एस डी मोरे, प्रा. माणिक कल्याणकर , डॉ.महेश अंभोरे, प्रा. संदीप जायभाये ,प्रा. अलका पवळे ,राजीव इंगोले ,राकेश वाडीले ,अशोक भालेराव, प्राजक्ता हाडोळतीकर, सतिश जाधव, सुदाम गायकवाड ,दत्ता कदम ,शंकर कोनापुरे , संतोष वाघमारे, राहुल राऊत व जिल्ह्यातील प्रगतिशील शेतकरी बांधव भगवान इंगोले, गुलाब मंजुषा पावडे, बळवंतराव पोळ, सुनील शिंदे, अमोल सावंत, शंकर इंगोले, मुंगल,हनवते, सर्व कृषी सखी यांची उपस्थिती होती.

# पिक विमा, सरसकट कर्ज माफीसाठी संभाजी ब्रिगेडचे तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण

अंबाजोगाई (प्रतिनिधी) सन २०२३ चा प्रधानमंत्री पिक विमा मंजूर करून तो सरसकट देण्यात यावा, शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करा, ई-पिक पाहणी अट रद्द करा आणि सन २०२० चा पिक विमा द्यावा या मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार, दिनांक २७ ऑगस्ट रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. याबाबत संभाजी ब्रिगेडच्या वतीने उपजिल्हाधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांना यापूर्वी निवेदन देण्यात आले होते. मागील अनेक महिन्यांपासून संभाजी ब्रिगेडने हा विषय लावून धरला आहे. पाठपुरावा सुरू ठेवला



आहे. प्रमुख मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार, दिनांक २७ ऑगस्ट रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांच्या पुढाकाराने सदरील विषयांकीत प्रश्नासंदर्भात उपोषण स्थळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे, तालुका कृषी अधिकारी एस.के.ढाकणे, मंडळ कृषी अधिकारी बी.एस. सूर्यवंशी, कृषी सहाय्यक पंडित काकडे आणि पिक विमा कंपनीचे तालुका प्रतिनिधी अनिकेत पोटभरे, रविंद्र सावंत, रमेश गडदे यांच्याशी सकारात्मक चर्चा करण्यात आली. लवकरच राज्याच्या कृषीमंत्र्यांची भेट घेऊन या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी संभाजी ब्रिगेड, शेतकरी संघटना यांचे शिष्टमंडळ तसेच विमा कंपनी आणि कृषि विभाग यांचे अधिकारी यावेळी उपस्थित असतील असे आश्वासन दिल्यानंतर उपोषणाची सांगता झाली. तत्पूर्वी संभाजी ब्रिगेडच्या वतीने उपजिल्हाधिकारी यांना १६ ऑगस्ट रोजी तर तालुका कृषी अधिकारी यांना २० ऑगस्ट रोजी निवेदन दिले आहे. निवेदनातील मागण्या अशा की, १) सन - २०२३ मध्ये सोयाबीनचे १०० टक्के नुकसान झाले आहे. म्हणून शासनाने शेतकऱ्यांना १०० टक्के पिक विमा द्यावा., २) महाराष्ट्रातील शेतकरी यांचे सरसकट कर्ज माफ करावे., ३) सध्या सोयाबीन व कापूस या पिकांना हेक्टरी ५ हजार रूपये अनुदान आले आहे. परंतु, ज्या शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणी केली नाही. त्या शेतकऱ्यांचे नांव अनुदान यादीत नाही. तरी त्या शेतकऱ्यांकरिता शासनाने ई-पिक पाहणी अट रद्द करावी. तसेच ४) सन २०२० चा पिक विमा द्यावा. आमच्या या मागण्या लवकर नाही मान्य केल्या तर आम्ही संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाभर आंदोलन करू याची नोंद घ्यावी असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे, संभाजी ब्रिगेड महिला आघाडी जिल्हाध्यक्षा अश्विनीताई यादव, तालुकाध्यक्षा सुनंदाताई लोखंडे, संभाजी ब्रिगेड जिल्हा उपाध्यक्ष अरूण पवार, जिल्हा सचिव नारायण मुळे, तालुकाध्यक्ष सिद्राम यादव, शहरसचिव प्रेम कांबळे, कार्यकर्ते अंगद कांबळे, अभिषेक माने, पृथ्वीराज सोनवणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. संभाजी ब्रिगेडच्या एक दिवसीय लाक्षणिक उपोषणाला शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट, जिल्हाध्यक्ष अनुरथ काशिद, मराठा सेवा संघाचे मा.जिल्हाध्यक्ष रामकिसन मस्के, रामराजे शिंदे, दत्ता साखरे, रोहन कुलकर्णी, सतिश कुंडगिर, केशव टेहरे, परमेश्वर मिसाळ, शिवाजी जगताप, विलास जाधव, बब्रुवान सोळंके, पांडुरंग तट, सुभाष मायकर, गोविंद जामदार, महादेव जामदार, दत्तात्रय मुळे, वशिष्ठ वानखेडे, हनुमंत काळे या तालुक्यातून आलेल्या शेतकऱ्यांनी जाहीर पाठिंबा दर्शविला. यावेळी संभाजी ब्रिगेडच्या विविध आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पावसाचा खंड पडला पिकाच्या वाढीसाठी करा या उपाययोजना

सध्या खरीपातील सोयाबीन, कापसासारखी पिके फुले आणि फळधारनेच्या अवस्थेत आहेत. अशा परिस्थितित राज्यात काही ठिकाणी पावसाने दडी मारल्याने पिकांच नुकसान होण्याची शक्यता असल्याने हलक्या जमिनी असणारे शेतकरी अधिक चिंताग्रस्त झाले आहेत. अशावेळी नेमक्या कोणत्या उपाययोजना कराव्या याबद्दल पल्लवी चिंचवडे यांनी शेतकऱ्यांना सल्ला दिला आहे. शेतकऱ्यांनी या काळात उपलब्ध पाणी साठा असल्यास पिकाच्या संवेदनशील अवस्थेत तुषार किंवा ठिबक या सूक्ष्मसिंचन पद्धतीने संरक्षित पाणी द्यावे. परंतु उपलब्ध पाणी साठा नसल्यास अशा वेळी इतर उपाययोजना करणे फायदेशीर ठरणार आहे. पेरणी करताना बिबीएफ पद्धतीचा वापर केल्यास सुरुवातीला पडलेला पाऊस सऱ्यांमद्धे साठविला जाऊन पाण्याची उपलब्धता वाढते. उत्पादनात 15 -20 टक्के वाढ होते. उशिरा झालेला पाऊस सऱ्यांमध्ये मुरवला जाऊन



रब्बी पिकांसाठी फायदेशीर ठरतो. पिकामध्ये हलकी कोळपणी करून झाडांना मातीची भर द्यावी त्यामुळे जमिनीवर पडलेल्या भेगा बुजवल्या जातात आणि ओलावा साठवून ठेवण्यास मदत होते. तणे, पाणी आणि अन्नद्रव्यांसाठी पिकासोबत स्पर्धा करतात त्यामुळे पीक तणविरहित ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी हलकी कोळपणी करून झाडभोवती मातीचे अछादन करावे. तसेच पिकाच्या दोन ओळींमधील मोकळ्या जागेत गव्हाचा भुसा, तांदळाचा पेंढा, शेतात काढलेले तण यांचे जैविक अछादन करावे. यासोबतच हलक्या जमिनीवर पिकांची पेरणी करताना उताराला आडवी पेरणी करावी जेणेकरून पावसाचे पाणी वाहून न जाता सऱ्या धरून ठेवतील आणि जमिनीत दीर्घकाळ ओलावा टिकून राहील. काळ्या कसदार, भारी जमिनीवर पेरणी करताना उताराला समांतर पेरणी करावी जेणेकरून पावसाचे जास्तीचे पाणी सहजपणे शेताबाहेर काढून देता येईल. पावसाच्या खंड कालावधीत बाष्पउत्सर्जन अधिक होते त्यामुळे पिकांची पाण्याची गरज वाढते. आशा वेळी अँटीट्रान्सपायरंटचा वापर करावा. 5% टक्के केओलीनाइटची फवारणी केल्यास पानांद्वारे होणारे बाष्पउत्सर्जन कमी करता येईल अशाप्रकारे पावसाचा खंड पडलेल्या कालावधीत पीक तग धरेल. पावसाचा खंड पडलेल्या कालावधीत पिकांच्या पांढऱ्या मुळांची वाढ थांबते म्हणून पिकाची वाढ खुंटते. पांढऱ्या मुळयांच्या वाढीसाठी मायकोरायझा बुरशीची आळवणी किंवा संरक्षित पाण्यासोबत सोडावे. तसेच ह्युमिक ॲसिडची फवारणी केल्याने पिकांना अन्न द्रव्यांचा पुरवठा केला जातो. अगदी कमी खर्चात घरगुती पातळीवर पांढऱ्या मुळांची संख्या वाढण्यासाठी तांदूळपाण्याचा वापर करता येतो. त्यासाठी 2 किलो तांदूळ पाण्यात उकळून त्यात 1 किलो गूळ, 10 लीटर पाण्यात मिसळून 4 दिवस आंबवत ठेवावे. 500 ते 600 मिलि तांदूळ पाणी प्रती 15 लीटर पाणी याप्रमानात फवारणी करावी. पाणी साठा उपलब्ध असेल तर आशा वेळी ह्युमिक ॲसिड, मायकोरायझा बुरशी किंवा तांदूळ पाणी यापैकी जे परवडेल ते तुषार/ठिबक सिंचनाच्या माध्यमातून द्यावे. यासोबतच के. बी. बायोचे नोवा ड्रिप प्रॉडक्ट खास पांढऱ्या मुळांच्या वाढीसाठी वापरता येते ज्याचे प्रमाण 1 लीटर प्रती एकर आहे.

सेंद्रिय शेती अभ्यासक – पल्लवी चिंचवडे

## राजकोट येथील पुतळा प्रकरणी सबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करा : केज तालुका काँग्रेस (आय) ची मागणी

केज । सचिन भालेराव



सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट येथे नव्याने उभारलेला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या प्रकरणी राज्य सरकारचा निषेध नोंदवून या निकृष्ट कामाला जबाबदार असलेले सबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केज तालुका काँग्रेस (आय) पक्षाचे तालुका अध्यक्ष प्रवीण खोडसे यांनी केली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट येथे सरकारने कोट्यावधी रू. खरच करून स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारला होता. या पुतळ्याचे अनावरण हे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. परंतु केवळ आठ महिन्या पूर्वी उभारलेला हा पुतळा कोसळला आहे. या अत्यंत दुर्दैवी आणि देशाला लांच्छनास्पद घटनेचा केज तालुका काँग्रेस (आय) पक्षाचे तालुका अध्यक्ष प्रवीण खोडसे यांनी तहसीलदारांना निवेदन देत भ्रष्ट सरकारचा निषेध व्यक्त करून केला आहे. या प्रकरणाला जबाबदार असलेले सबंधित भ्रष्ट अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी निवेदनात केली आहे. निवेदनावर तालुका अध्यक्ष प्रवीण खोडसे यांच्यासह विशाल मुळे, महादेव खोडसे, नारायण काकडे, ज्योतीराम माने यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अधिकाऱ्यांनो दबावतंत्रास बळी पडू नका, मुख्यमंत्री योजनेचा लाभ गोरगरीबाच्या घरात पोहचवा- अनिलदादा जगताप

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ट्रेनी शिक्षकांच्या निवडीसाठी गरजवंत उमेदवारास प्राधान्य द्यावे

बीड, प्रतिनिधी- मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ग्रामीण भागात प्रती शाळा एक प्रशिक्षणार्थी या प्रमाणे सुयोग्य व पात्र उमेदवारांची कागदपत्रे प्राप्त करून शाळेकरिता एका प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षकांची निवड करायाची आहे. मात्र संबंधित अधिकारी सरपंच व इतर लोकांच्या दबावाखाली येऊन स्वतःची नातलग संबंधी यांनाच गरज नसताना या योजनेचा फायदा करून देत आहेत. यामुळे तळागाळातील गरजू लोकांची हेळसांड होत असून या योजनेसाठी सर्वोपरी पात्र असलेल्या गोरगरीब कुटुंबातील उमेदवारास लाभ होत नसल्याच्या तक्रारी शिवसेना कार्यलयात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब सर्व सामान्य जनतेच्या हितासाठी योजना राबवत आहेत, त्या आमलात आणत आहेत. मात्र काही अधिकारी दबावतंत्रास बळी पडून गोरगरीब आणि गरजू माणसांच्या तोंडातला घास काढून नाते संबंधातील अपात्र उमेदवारास भरवत आहे. त्या सर्व अधिकाऱ्यांना माझे कळकळीचे आवाहन आहे की, त्यांनी कुणाच्याही दबावाखाली न येता मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ग्रामीण भागात प्रती शाळा एक प्रशिक्षणार्थी या प्रमाणे सुयोग्य व पात्र उमेदवारांची कागदपत्रे प्राप्त करून नियम अटींनुसारच शाळेकरिता एका प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षकांची निवड करावी. जर आपल्यावर कुणी दबाव टाकत असेल तर याची माहिती आम्हाला द्यावी. मात्र कुणाच्या दबावाखाली येऊन अपात्र




उमेदवाराची निवड करू नये. अन्यथा शिवसैनिकांशी गाठ असेल आणि त्यांना शिवसेना स्टाईलनेच उत्तर देण्यात येईल असे शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी माध्यमांना पत्रक जारी करत अधिकाऱ्यांना सूचना आवाहन करून कडक इशारा दिला आहे.

गरजवंत आणि पात्र उमेदवाराची हेळसांड कदापि सहन करणार नाही- अनिलदादा जगताप मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ग्रामीण भागात प्रती शाळा एक प्रशिक्षणार्थी या प्रमाणे सुयोग्य व पात्र उमेदवारांची कागदपत्रे प्राप्त करून शाळेकरिता एका प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षकांची निवड करायाची आहे. मात्र संबंधित अधिकारी सरपंच व इतर लोकांच्या दबावाखाली येऊन स्वतःची नातलग संबंधी यांनाच गरज नसताना या योजनेचा फायदा करून देत आहेत. यामुळे तळागाळातील गरजू लोकांची हेळसांड होत असून या योजनेसाठी सर्वोपरी पात्र असलेल्या गोरगरीब कुटुंबातील उमेदवारास लाभ होत नसल्याच्या तक्रारी शिवसेना कार्यलयात आल्या आहेत. अधिकाऱ्यांनी कुणाच्याच दबावाखाली न येता नियम अटीनुसारच काम करावे आणि मुख्यमंत्री योजनेचा लाभ गोरगरीब गरजवंत पात्र उमेदवारास द्यावा. गरजवंत आणि पात्र उमेदवाराची हेळसांड कदापि सहन करणार नाही असे शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी माध्यमांना जारी केलेल्या पत्रकात म्हंटले आहे.
ooooo

# गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे -जिल्हाधिकारीअविनाश पाठक

## उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक

**बीड। प्रतिनिधी** बीड, दि. 27 : शांततापूर्वक आणि संयमी पणाने आपण येणाऱ्या काळातील गणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आज येथे केले. जिल्हयातील गणेशोत्सवासह येणाऱ्या काळातील सणांच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक आज नियोजन समितीच्या सभागृहात झाली, यावेळी ते बोलत होते. जिल्ह्यातील शांतता समितीच्या या बैठकीला पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ, अपर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, पोलिस उपविभाग माजलगाव डी. बी. धिरजकुमार तसेच निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्ह्यातील नगरपालिकांचे मुख्य अधिकारी तसेच प्रशासकही



यावेळी बैठकीत उपस्थित होते. शहरात उत्सव चांगल्या पद्धतीने पार पाडावा यासाठी बीडमधील नगर रोडवरील एक बाजू येत्या आठ दिवसात सुरू केली जाईल. व दुसऱ्या बाजुचे खड्डे बुजविले जातील आणि पुढील काम उत्सवानंतर केले जाईल असे त्यांनी सांगितले. मिरवणूक मार्गावर असणाऱ्या विजेच्या तारांपासून सुरक्षा असावी या दृष्टीकोणातून कामे करावीत असे निर्देश त्यांनी वीज मंडळास यावेळी दिले. मंडळांनी शांततेत उत्सव पार पडावा यासाठी सहकार्य करावे, असे ते म्हणाले. अनधिकृत होर्डिंग /ध्वनी प्रदूषणबाबत बीड शहरातील तसेच इतर भागातील सर्व अनधिकृत होर्डिंग येत्या चार दिवसात हटविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्री पाठक यांनी दिले. जिल्ह्यातील मोठ्या गावांमध्ये ग्रामपंचायतींनी होर्डिंग हटवावेत असेही ते म्हणाले. तंत्रज्ञान प्रगत झाले आहे त्यामुळे डिजिटल पुरावे कोणीही गोळा करू शकते या पार्श्वभूमीवर ध्वनी प्रदूषण होणार नाही याची खबरदारी मंडळांनी घ्यावी तसे झाले नाही तर थेट गुन्हे दाखल होतील, असेही गणेश मंडळाच्या अध्यक्षांना त्यांनी सांगितले. सोबतच मंडळांनी स्वतंत्र वीज मीटर घ्यावे. त्यासाठी एका दिवसात मीटर देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे, असे सांगून जिल्हाधिकारी म्हणाले की, कुणासही काही अडचण असल्यास त्यांनी व्हाट्सपच्या 8788998499 या क्रमांकावर लेखी किंवा छायाचित्रांद्वारे कळवावे. यावेळी ग्रामीण भागात तालुका पातळीवर मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धा घेतली जाईल तसेच राज्य शासनाच्या गणेशोत्सव स्पर्धेत सहभाग घेण्याचे आवाहन त्यांनी केले. पोलीस अधीक्षक यांनी कायदा सुव्यवस्था राखण्याचे आवाहन यावेळी केले. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले.

## वंजारी महासंघाकडून ज्ञानेश्वर बुधवत यांना राष्ट्रसंत भगवान बाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान



सिंदखेड राजा । प्रतिनिधी

वंजारी महासंघाचे दुसरे राज्यस्तरीय साहित्य संमेलन दिनांक २५ ऑगस्ट रोजी गंगा लॉन्स राष्ट्रसंत भगवानबाबा चौक निर्मल नगर अहमदनगर येथे नुकतेच उत्साहात संप्पन्न झाले.या संमेलनासाठी संमेलनाध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. सांगिता घुगे तर उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप हे उपस्थित होते. वंजारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष विचारवंत गणेशजी खाडे,स्वागताध्यक्ष म्हणून आंतरराष्ट्रीय कुस्ती पटू राजकुमार आघाव तर सहस्वागताध्यक्ष रेणुका वराडे अनेक दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.या संमेलनात दैनिक लोकनेताचे संपादक, ज्ञानेश्वर बुधवत यांना राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्यरत्न पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला.

ज्ञानेश्वर बुधवत मातृतीर्थ सिंदखेडराजा तालुक्यातील सावखेड तेजन या खेडे गावातले असून ज्ञानेश्वर बुधवत यांच्या निर्भिड व निःपक्षपाती पत्रकारिता या सर्व कामाची दखल घेऊन वंजारी महासंघ महाराष्ट्र यांच्या मार्फत ' राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्यरत्न पुरस्कार २०२४ ' लेखक, संपादक ज्ञानेश्वर बुधवत यांना नुकताच प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे ज्ञानेश्वर बुधवत यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

बुधवार २८ ऑगस्ट २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे










हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com